महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त व अनुदानित महाविद्यालय
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव संलग्नीत
"B" Grade NAAC Accredited (2.66)
भगिनी मंडळ चोपडा संचलीत

# समाजकार्य महाविद्यालय, चोपडा

सुंदरगढी, चुंचाळे रोड, चोपडा – ४२५१०७ जि.जळगांव




## समाजकार्य स्नातक (बी.एस.डब्ल्यू.)

# माहिती पत्रक



प्राचार्य
डॉ ईश्वर एम. सौंदाणकर

सचिव
सौ.उर्मिला वसंतलाल गुजराथी

अध्यक्षा
सौ.पुनम आशिष गुजराथी

समाजकार्य महाविद्यालय, चोपडा फोन (०२५८६) २२३०१७ मो. ९४२३९०३७४७
Website : www.bmcswchopda.org | Email : bmcsw.chopda@gmail.com

## भगिनी मंडळ, चोपडा संचलीत

### आमच्या शाखा

- बालक मंदिर, चोपडा
- महिला मंडळ, व्हॉलंटरी स्कुल, चोपडा
- महिला मंडळ, माध्यमिक विद्यालय, चोपडा
- महिला मंडळ माध्य. व उच्च माध्य. विद्यालय (किमान कौशल्य अभ्यासक्रम), चोपडा
- महिला मंडळ माध्य. विद्यालय (कला व वाणिज्य), चोपडा
- ललित कला केंद्र, चोपडा
- प्रेरणा मतिमंद विद्यालय, चोपडा
- समाजकार्य महाविद्यालय, चोपडा
- औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) चोपडा
- कृषि तंत्र विद्यालय, अडावद ता.चोपडा
- स्कुल ऑफ नर्सिंग, चोपडा
- इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च, चोपडा
- राष्ट्रीय बालकामगार शाळा क्र. ५ व ६ चोपडा
- हनुमान व्यायाम शाळा, चोपडा





## आशिर्वाद



परम श्रध्देय

**शाह गोवर्धनदास भिकारीदास**

उर्फ (नानाजी)

## प्रेरणास्थान



## स्व. डॉ. सुशीलाबेन शाह





### भगिनी मंडळ चोपडा संचलित...

## समाजकार्य महाविद्यालय, चोपडा, जि.जळगांव

आजच्या एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर येऊन पोचलेल्या गतीशील आणि परिवर्तनशील जीवनात समाजातील निरनिराळ्या समस्या दिवसेंदिवस वाढतच आहे. मानव ह्या समाजशील प्राण्याची समाजाप्रती, राष्ट्राप्रती निष्ठा व आपुलकी कमी होत असतांना दिसून येते. मानवाच्या स्वयंकेंद्रित प्रवृत्तीमुळे आजच्या धकाधकीच्या जीवनात मानवाला सामाजिक सौख्य लाभणे अत्यावश्यक आहे.

यासाठी समाजकार्याच्या व्यावसायिक अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांच्या सुप्तगुणांना चालना देणारे व विकसित करणारे अनिवार्य अभ्यासक्रमातील घटक अर्थात परिसंवाद, संभाषण, कला, लेखा-लेखाण, प्रभावी वक्तव्य, नाटक, पथनाट्य व भाषण यासारख्या मंच धाडस व चार-चौघात, कोणत्याही प्रश्नांवर बोलू शकण्याची क्षमता या अभ्यासक्रमातून विकसित केली जाते. तसेच सामाजिक सहिष्णुता वाढीच्या दृष्टीने सकारात्मक प्रयत्न कौशल्यपूर्णपणे या अभ्यासक्रमात होत असतात.

पूर्वी सामाजिक सौख्य, शांतता राखण्याचे काम समाजप्रमुख, कुटुंबप्रमुख, समाजसेवक करीत असत, परंतु आता अशा व्यक्ती अभावानेच आढळतात.

समाजातील समस्या ज्याप्रमाणे वाढत आहेत. त्याचप्रमाणे त्यांचे स्वरूपही गुंतागुंतीचे होत आहे. अशा समस्यांच्या शास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करून त्यांना मार्गी लावतांना स्वहीत सांभाळणेही गरजेचे झालेले आहे. आपण दिलेल्या सेवेचा योग्य मोबदला समाजकार्य स्नातक (बी.एस.डब्ल्यू.) शिक्षणातून अपेक्षित आहे. आजच्या औद्योगिक युगात अशा व्यवसायाभिमुख अभ्यासक्रमाचे महत्व लक्षात घेतले असून अशा पदवीधारकांना या अभ्यासक्रमाचा फायदा नोकरीच्या संदर्भात पुढील संधी देण्यास उपयोगी ठरतो. गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी, सामुदायिक विकास अधिकारी, प्रकल्प पर्यवेक्षक, कामगार कल्याण अधिकारी, कामगार सल्लागार अधिकारी, कामगार अधिकारी, तुरुंग अधिकारी (जेलर), वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता, शालेय समाज कार्यकर्ता, जनसंपर्क अधिकारी, रिमांड होम अधिकारी, समाज कल्याण अधिकारी, वसतिगृह अधिक्षक (स्त्रियांचे व पुरुषांचे), महिला व बालविकास अधिकारी कुटुंब सल्ला केंद्रात सल्लागार अधिकारी, परिविक्षा (प्रोबेशन) अधिकारी, अपंग विकास अधिकारी या प्रकारे शासनाच्या अनेक विभागात नोकरीच्या संधी घेता येईल. तसेच खाजगी समाजकार्य करणाऱ्या अर्थात आदिवासी आश्रमशाळा, अंध विद्यालय, मुक-बधीर विद्यालय, मतिमंद विद्यालय, निराश्रीत महिलांचे वसतिगृह, वृध्दाश्रम, अनाथालय, महिलांची वसतिगृह व जिल्हा परिषदेच्या अनेक प्रकल्पांमध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध होऊ शकतात, अशा प्रकारे अनेक क्षेत्रात समाजकार्य पदवीधारकांना नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत.

तसेच समाजशास्त्र, मानसशास्त्र यासारख्या विषयांसोबत प्रत्यक्ष कृती पूर्व अनुभवाने व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीने तो लाभ होतो तो वेगळाच. एक परिपूर्ण पायाभूत अभ्यासक्रम म्हणून या क्षेत्राकडे बघितल्यास स्वतःच्या जीवनातील अडीअडचणींचे समायोजन साधने निश्चित सुलभ होते.

समाजकार्याच्या क्षेत्रातील उच्च शिक्षणाने तर ह्या कक्षा अधिकच विस्तारांच्या असून अत्यंत सन्मानाच्या पदावर अनेक प्रशिक्षित व्यक्ती कार्यरत आहेत.

**प्रवेशपात्रता – बी.एस.डब्ल्यू. – प्रथम वर्ष** : या अभ्यासक्रमात खालील पात्रताधारक विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येईल.

अ) महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाची १२ ( ) वीची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या कोणत्याही शाखेच्या विद्यार्थ्यांस समाजकार्य स्नातक प्रथम सत्र, प्रथम वर्ष ला प्रवेश घेता येईल.

ब) समाजकार्य पदविका प्रमाणपत्र (सी.एस.डब्ल्यू.) परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येईल.

क) किमान कौशल्य (के.के.) हा दोन वर्षांचा अभ्यासक्रम उत्तीर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येईल.

**अभ्यासक्रमाचा कालावधी** : बी.एस.डब्ल्यू. हा तीन वर्षाचा पदवी अभ्यासक्रम आहे. बी.एस.डब्ल्यू., अभ्यासक्रमाचे शैक्षणिक सत्र प्रत्येक वर्षी जुलै ते एप्रिल पर्यंत (विद्यापीठ नियमानुसार) राहील.

**वयोमर्यादा** : या अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी अर्जदार हा कमीत कमी १७ वर्षे वयाचा असावा.

**शिकविण्याचे माध्यम** : ह्या अभ्यासक्रमासाठी शिकविण्याची भाषा मराठी व इंग्रजी ह्या दोन राहतील. तसेच विद्यार्थ्यांना उत्तर पत्रिका मराठी किंवा इंग्रजी भाषेत लिहिता येईल. शैक्षणिक वर्ष २०१०–११ पासून सेमिस्टर (सत्र) पध्दत उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव यांनी लागू केलेली असून शै.वर्ष २०१७–१८ पासून पुनर्रचित अभ्यासक्रम खालीलप्रमाणे आहे.

**निवडपध्दती** : प्रवेश प्रक्रियेसाठी निर्धारित कालावधी मध्ये प्रवेश अर्ज स्विकारले जातील व प्राप्त अर्जांच्या आधारे छाननी करून सवर्गनिहाय गुणवत्ता यादी प्रकाशित करण्यात येईल. त्यानुसारच प्रवेश देण्यात येतील. (फक्त एफ.वाय.बी.एस.डब्ल्यू. साठी)





## Syllabus Structure of B.S.W. Course

### FIRST YEAR — Ist Semester

| Subject Code | TITLE | Suggested Clock Hours | Marks Alloted |
|---|---|---|---|
| BSW-111 | English | 40 Hours | 100 |
| BSW-112 | Ideology and Introduction to Social Work | 40 Hours | 100 |
| BSW-113 | Working with Individual and Family | 40 Hours | 100 |
| BSW-114 | Fields of Social Work | 40 Hours | 100 |
| BSW-115 | Sociology for Social Worker | 40 Hours | 100 |
| BSW-116 | Field Work | 144 Hours | 100 |

### IInd Semester

| Subject Code | TITLE | Suggested Clock Hours | Marks Alloted |
|---|---|---|---|
| BSW-121 | Emerging Trends in Fields of Social Work | 40 Hours | 100 |
| BSW-122 | Human Rights | 40 Hours | 100 |
| BSW-123 | Indian Social Problems | 40 Hours | 100 |
| BSW-124 | Working with Group | 40 Hours | 100 |
| BSW-125 | Human Growth and Behavior | 40 Hours | 100 |
| BSW-126 | Field Work | 144 Hours | 100 |

### SECOND YEAR — IIIrd Semester

| Subject Code | TITLE | Suggested Clock Hours | Marks Alloted |
|---|---|---|---|
| BSW-231 | English | 40 Hours | 100 |
| BSW-232 | Introduction to Social Legislation | 40 Hours | 100 |
| BSW-233 | Introduction to Indian Constitution | 40 Hours | 100 |
| BSW-234 | Introduction to Indian Economy and Co-operation | 40 Hours | 100 |
| BSW-235 | Working with Communities | 40 Hours | 100 |
| BSW-236 | Field Work | 144 Hours | 100 |

## IVth Semester

| Subject Code | TITLE | Suggested Clock Hours | Marks Alloted |
|---|---|---|---|
| BSW-241 | Introduction to Tribal Life | 40 Hours | 100 |
| BSW-242 | Introduction to Social Work Research | 40 Hours | 100 |
| BSW-243 | Introduction to Local Self Government | 40 Hours | 100 |
| BSW-244 | Social Reform Movements in India | 40 Hours | 100 |
| BSW-245 | Introduction to Women Studies | 40 Hours | 100 |
| BSW-246 | Field Works | 144 Hours | 100 |

**THIRD YEAR**

## Vth Semester

| Subject Code | TITLE | Suggested Clock Hours | Marks Alloted |
|---|---|---|---|
| BSW-351 | English | 40 Hours | 100 |
| BSW-352 | Participatory Approaches in Social Work | 40 Hours | 100 |
| BSW-353 | Para-Legal Education | 40 Hours | 100 |
| BSW-354 | Social Welfare Administration | 40 Hours | 100 |
| BSW-355 | Counselling in Social Work | 40 Hours | 100 |
| BSW-356 | Field Work | 144 Hours | 100 |

## VI th Semester

| Subject Code | TITLE | Suggested Clock Hours | Marks Alloted |
|---|---|---|---|
| BSW-361 | Life and Soft Skill Education for Social Worker | 40 Hours | 100 |
| BSW-362 | Social Policy and Planning in India | 40 Hours | 100 |
| BSW-363 | Health System in India | 40 Hours | 100 |
| BSW-364 | Communication For Development | 40 Hours | 100 |
| BSW-365 | Development of Weaker Section | 40 Hours | |
| BSW-366 | Field Work | 144 Hours | 100 |
| BSW-367 | Research Dissertation | ½ Hours Per Student Per Week | 100 |
| BSW-368 | Viva Voce | | 50 |





# Structure of The B.S.W. of Six Semesters

## Ist Semester

| Sr. No. | Subject | Max. Marks |
|---|---|---|
| 01 | English | 100 |
| 02 | Basic Social Work Theory Paper 4x100 Marks | 400 |
| 03 | Field Work (Internal Assessment) | 100 |

## II nd Semester

| Sr. No. | Subject | Max. Marks |
|---|---|---|
| 01 | Basic Social Work Theory Papers 5 x 100 Marks | 500 |
| 02 | Field Work (Internal Assessment) | 100 |

## III rd Semester

| Sr. No. | Subject | Max. Marks |
|---|---|---|
| 01 | English | 100 |
| 02 | Basic Social Work Theory Paper 4x100 Marks | 400 |
| 03 | Field Work (Internal Assessment) | 100 |

## IV th Semester

| Sr. No. | Subject | Max. Marks |
|---|---|---|
| 01 | Basic Social Work Theory Papers 5 x 100 Marks | 500 |
| 02 | Field Work (Internal Assessment) | 100 |

## V th Semester

| Sr. No. | Subject | Max. Marks |
|---|---|---|
| 01 | English | 100 |
| 02 | Basic Social Work Theory Paper 4x100 Marks | 400 |
| 03 | Field Work (Internal Assessment) | 100 |

## VI th Semester

| Sr. No. | Subject | Max. Marks |
|---|---|---|
| 01 | Basic Social Work Theory Papers 5 x 100 Marks | 500 |
| 02 | Field Work (Internal Assessment) | 100 |
| 03 | Research Dissertation (External) | 100 |
| 04 | Vivo Voce (External) | 50 |

## Structure of Field Work

| Ist Semester - Content | Max. Marks |
|---|---|
| 1) Observational Visits to welfare Agencies (10 Visits) | 30 |
| 2) Seminar on Social Issues | 20 |
| 3) Individual Conference & Group Conference | 10 |
| 4) Recording Keeping / Writing Skills | 20 |
| 5) Viva - Voce on Field Work | 20 |
| | 100 |

| IInd Semester - Content | Max. Marks |
|---|---|
| 1) Village Camp | 30 |
| 2) Group Discussion | 20 |
| 3) Individual Conference & Group Conference | 10 |
| 4) Recording Keeping / Writing Skills | 20 |
| 5) Viva - Voce on Field Work | 20 |
| | 100 |

| IIIrd Semester - Content | Max. Marks |
|---|---|
| 1) Concurrent Field Work (Social Case Work and Group Work) | 30 |
| 2) Seminar on Field work Task | 20 |
| 3) Individual Conference & Group Conference | 10 |
| 4) Recording Keeping / Writing Skills | 20 |
| 5) Viva - Voce on Field Work | 20 |
| | 100 |

| IV th Semester - Content | Max. Marks |
|---|---|
| 1) Concurrent Field Work (Social Case Work and Group Work) | 30 |
| 2) Study Tour | 20 |
| 3) Individual Conference & Group Conference | 10 |
| 4) Recording Keeping / Writing Skills | 20 |
| 5) Viva - Voce on Field Work | 20 |
| | 100 |



समाजकार्य महाविद्यालय, चोपडा

| V th Semester - Content | Max. Marks |
|---|---|
| 1) Concurrent Field Work (Community Organization) | 40 |
| 2) Class Room Seminar or Web Site Review on Social Issues | 10 |
| 3) Individual Conference & Group Conference | 10 |
| 4) Recording Keeping / Writing Skills | 20 |
| 5) Viva - Voce on Field Work | 20 |
| | 100 |

| VI th Semester - Content | Max. Marks |
|---|---|
| 1) Concurrent Field Work (Community Organization) | 40 |
| 2) Special Awareness Campaign | 10 |
| 3) Individual Conference & Group Conference | 10 |
| 4) Recording Keeping / Writing Skills | 20 |
| 5) Viva - Voce on Field Work | 20 |
| | 100 |

**Grand Total of Six Semester (Field Work) - 600 Marks**

| Research Dissertation - Content | Max. Marks |
|---|---|
| * Research Dissertation | 100 |
| * Viva-Voce on Research Dissertation (External) | 50 |
| TOTAL | 150 |

**RESEARCH DISSERTATION**

1) Students of V[th] semester are required to select an appropriate topic for their research dissertation and complete the same in the VI[th] semester. It shall be submitted to the university before commencement of VI[th] semester Examination and it must be signed by the concerned research guide and principal of the college.
2) The Viva-Voce on Research dissertation will be evaluated for 50 marks.
3) The research report must be type written and well bound.

**FIELD WORK ASSESSMENT (INTERNAL)**

The marks obtained by the students in Field Work (Internal) shall be sent to the university before the respective examination.

**VIVA-VOCE (External)**

There shall be a viva-voce (external) of 50 marks at the end of VI[th] semester on Research dissertation.

**HEAD OF PASSING**

The following shall be separate head of passing

| | | | |
|---|---|---|---|
| 1) Written Theory Papers | 20 marks | 2) Field Work | 25 marks |
| 3) Research dissertation | 25 marks | 4) Viva-Voce | 25 Marks |

Failure in any one of the head shall be considered failure at the B.S.W. Course.

# Faculty of Humanities

## Template for Defining Course : FY BSW Under CBCS June-2020 Pattern

w.e.f. - June 2020-21

| Course Pattern : CGPA [60+40] Pattern | | | | |
|---|---|---|---|---|
| **Course Part Definition** | **Course Part Term Definition** | | | |
| **FY** | **Sem-I** | | **Sem-II** | |
| Min Papers - 13 | Min Papers | 6 | Min Papers | 7 |
| Max Papers - 13 | Max Papers | 6 | Max Papers | 7 |
| Min Marks - 00 | Min Marks | 0 | Min Marks | 0 |
| Max Marks - 1300 | Max Marks | 600 | Max Marks | 700 |
| Total Credits - 50 | Total Credits | 24 | Total Credits | 26 |

| Sem | Course Code | 2020-21 Paper Code | 2020-21 Paper Name | Paper Type | Credits | No. of Lect in Hr. / wk | Teaching Learning | Assessment Method | Total Marks Max Marks | Total Marks Min Marks | External (UA) Max Marks | External (UA) Min Marks | Internal (CA) Max Marks | Internal (CA) Min Marks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| I | CC-1 | | BSW-111 Introduction to Social Work Profession | G | 4 | 4 | Lecture | Theory | 100 | 40 | 60 | 24 | 40 | 16 |
| I | CC-2 | | BSW-112 Method of Social Work - Social Case Work | G | 4 | 4 | Lecture | Theory | 100 | 40 | 60 | 24 | 40 | 16 |
| I | SEC -1 | | BSW-113 Basic English Grammar | G | 4 | 4 | Lecture | Theory | 100 | 40 | 60 | 24 | 40 | 16 |
| I | IC-1 | | BSW-114 Sociology and Indian Social Problems | G | 4 | 4 | Lecture | Theory | 100 | 40 | 60 | 24 | 40 | 16 |
| I | | | Select Any One of Following BSW GEC | | | | | | | | | | | |
| I | GEC -1 | | BSW-115 A) Value Education | G | 4 | 4 | Lecture | Theory | 100 | 40 | 60 | 24 | 40 | 16 |
| I | GEC -1 | | BSW-115 B) Youth Development | G | 4 | 4 | Lecture | Theory | 100 | 40 | 60 | 24 | 40 | 16 |
| I | FWP-1 | | BSW-116 Field Work Practicum | G | 4 | 12 | Lecture | Field Wo | 100 | 50 | - | - | 100 | 50 |
| II | CC-3 | | BSW-121 Method of Social Work - Social Group Work | G | 4 | 4 | Lecture | Theory | 100 | 40 | 60 | 24 | 40 | 16 |
| II | CC-4 | | BSW-122 Fields of Social Work | G | 4 | 4 | Lecture | Theory | 100 | 40 | 60 | 24 | 40 | 16 |
| II | SEC -2 | | BSW-123 Introduction to Field Work Practice in Social Work | G | 4 | 4 | Lecture | Theory | 100 | 40 | 60 | 24 | 40 | 16 |
| II | IC-2 | | BSW-124 Human Growth and Behaviour | G | 4 | 4 | Lecture | Theory | 100 | 40 | 60 | 24 | 40 | 16 |
| | | | Select Any One of Following BSW GEC | | | | | | | | | | | |
| II | GEC-2 | | BSW-125 A) Urban Development | G | 4 | 4 | Lecture | Theory | 100 | 40 | 60 | 24 | 40 | 16 |
| II | GEC-2 | | BSW-125 B) Rural Development | G | 4 | 4 | Lecture | Theory | 100 | 40 | 60 | 24 | 40 | 16 |
| II | FWP-2 | | BSW-126 Field Work Practicum | G | 4 | 12 | Lecture | Field Wo | 100 | 50 | - | - | 100 | 50 |
| II | | 55557 | Environmental Studies | G | 2 | 4 | Lecture | Theory & | 100 | 40 | 80 | 32 | 20 | 8 |

## ग्रंथालय :

ग्रंथालयातून प्रत्येक विद्यार्थ्याला सात दिवसांसाठी एक ग्रंथ मिळविता येईल. ठराविक मुदतीच्या आत ग्रंथ परत न केल्यास विद्यार्थी दंडास पात्र ठरतो, ग्रंथाची योग्य काळजी न घेतल्यास ग्रंथ किंवा पुस्तके हरविल्यास अथवा ग्रंथालयात असभ्य वर्तणूक केल्यास ग्रंथपालाच्या शिफारशीनुसार विद्यार्थ्यांस दंड केला जाईल. ओळखपत्र दाखविल्याशिवाय ग्रंथालयातून पुस्तके मिळणार नाही. वार्षिक परीक्षा सुरू होण्यापूर्वी १५ दिवस अगोदर पुस्तके ग्रंथालयात जमा करावी. अन्यथा त्यास परीक्षेचे प्रवेशपत्र दिले जाणार नाही.

तसेच ज्या विद्यार्थ्यांस परीक्षा कालावधीत ग्रंथालयाचे पुस्तके पाहिजे असतील त्या विद्यार्थ्यांनी पुस्तकांची पूर्ण किंमत भरून पुस्तक घेऊन जावे ज्या दिवशी विद्यार्थी पुस्तक महाविद्यालयात परत करेल त्या दिवशी पुस्तकाची जमा रक्कम त्यास परत करण्यात येईल. मात्र पुस्तक फाडल्यास, हरविल्यास पुस्तकाची पूर्ण किंमत वसूल करण्यात येईल.

## विद्यार्थ्यांना शासनाकडून मिळणाऱ्या विविध शिष्यवृत्ती / फी सवलत :

**१) ई.बी.सी.**

अ) ई.बी.सी. अर्जाच्या दोन प्रती (अर्ज महाविद्यालयातून मिळेल.)

ब) उत्पन्नाच्या दाखल्याच्या दोन प्रती

क) मागील वर्षी ई.बी.सी. सवलत आदेश क्रमांक प्राचार्य / मुख्याध्यापक यांच्या सहीनिशी जोडावा. कनिष्ठ महाविद्यालयीन मुलांनी फक्त अपत्यांच्या दाखल्याच्या दोन प्रती व प्रतिज्ञापत्राच्या दोन प्रती जोडणे आवश्यक आहे.

**२) पी.टी.सी.**

अ) प्राथमिक शिक्षक सवलतीचे दोन अर्ज.

ब) उत्पन्नाच्या दाखल्याचे दोन प्रती

क) म. शिक्षणाधिकारी यांची प्रतिस्वाक्षरी

ड) अपत्याबाबत प्रमाणपत्र

**३) अपंग विद्यार्थी शिष्यवृत्ती**

शारीरिक दृष्ट्या अपंग असलेल्या विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करता येईल. अशा विद्यार्थ्यांना मागील परीक्षेत कमीतकमी ४० टक्के गुण मिळणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या विशेषतज्ञ डॉक्टरांचे मेडिकल सर्टिफिकेट शिष्यवृत्ती अर्जासोबत जोडावे.



समाजकार्य महाविद्यालय, चोपडा

**४) भारत सरकार शिष्यवृत्ती**

एस.सी. / एस.टी. / व्ही.जे.एन.टी. / ओ.बी.सी. / एस.बी.सी. विद्यार्थ्यांनी भारत सरकार शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन भरून आवश्यक कागदपत्रासह कार्यालयात मुदतीत सादर करावा. ऑनलाईन अर्ज न भरल्यास विद्यार्थ्यांस पूर्ण शुल्क भरावे लागेल.

## शिष्यवृत्ती धारकांनी अर्ज सादर करतेवेळी जोडावयाची कागदपत्रे

| | | |
|---|---|---|
| १) | ऑनलाईन अर्जाची एक प्रिंट | – १ |
| २) | अर्जासोबत शाळा / महाविद्यालय सोडल्याचा दाखला सत्यप्रत | – १ |
| ३) | गुणपत्रिकेची सत्यप्रत | – १ |
| ४) | जातीच्या प्रमाणपत्राची सत्य प्रत | – १ |
| ५) | तहसिलदाराच्या उत्पन्नाचा दाखला व प्रतिज्ञापत्र | – १ |
| ६) | पासपोर्ट आकाराचे फोटो | – १ |
| ७) | खंड असल्यास प्रतिज्ञापत्राची मूळप्रत | – १ |
| ८) | मागील शिष्यवृत्ती मंजुरीचे आदेश क्रमांक | – १ |
| ९) | वडील मयत असल्यास मृत्यूचा दाखला | – १ |
| १०) | जिल्हा बदल असल्यास जिल्हा बदल प्रमाणपत्र | – १ |

## शैक्षणिक शुल्क

बी.एस.डब्ल्यू. या त्रिवर्षीय अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणारे शुल्क हे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांनी ठरवून दिलेल्या शुल्काप्रमाणे राहील.

## उपस्थिती

१) महाविद्यालयात १०० टक्के उपस्थिती आग्रही आहे. विद्यापीठ नियमानुसार प्रत्येक विषयात ८० टक्के उपस्थिती अनिवार्य आहे.

२) पूर्व परवानगी शिवाय सतत ८ दिवस अनुपस्थिती असल्यास विद्यार्थ्यांचे नांव पटावरून काढण्यात येईल.

३) कोणत्या दीर्घ सुटीनंतर महाविद्यालय उघडण्याच्या प्रथम दिवशी गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थ्यांकडून योग्य तो दंड आकारण्यात येईल.

४) क्षेत्रकार्य (Field-Work) ला १००% उपस्थिती अनिवार्य आहे. जर विद्यार्थी सतत दोन क्षेत्रकार्य (Field-Work) ला गैरहजर असेल तर त्याने गैरहजर राहण्यासंबंधी योग्य ते कारण न दिल्यास त्याच्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल. तसेच गैरहजर राहायचे असल्यास

तद्संबंधी विनंती अर्ज क्षेत्रकार्यप्रमुख (Field Work Incharge) किंवा पर्यवेक्षक (Supervisor) यांचेकडे देणे आवश्यक आहे.

५) १५ ऑगस्ट, २६ जानेवारी तसेच संस्थेच्या वेळोवेळी होणाऱ्या विविध कार्यक्रमांना उपस्थिती राहणे सक्तीचे आहे.

## शारीरिक क्षमता चाचणी व वैद्यकीय तपासणी

विद्यार्थी व विद्यार्थिनींनी दिलेल्या विद्यापीठाच्या नियमान्वये शारीरिक क्षमता चाचणी व वैद्यकीय तपासणी करिता प्रत्येक वेळेत व दिनांकानुसार हजर राहून तपासणी करणे अनिवार्य आहे.

## महाविद्यालयीन परीक्षा

प्रत्येक सत्रात होणाऱ्या महाविद्यालयीन परीक्षा व चाचणी परीक्षेला उपस्थित राहणे अनिवार्य आहे. तसेच शेकडा ५० टक्के गुण मिळविणे अनिवार्य राहील. परीक्षेस अनुपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यास दंड आकारला जाईल तर शेकडा ५०% कमी गुण असणाऱ्या विद्यार्थ्यांस पुन्हा परीक्षा द्यावी लागेल.

## महाविद्यालय सोडण्याचा दाखला

१) हा दाखला मिळण्यासाठी विद्यार्थ्यांनी पालकांच्या सहीनिशी अर्ज करावा. अर्ज महाविद्यालयात सादर केल्यानंतर ७ दिवसांनी दाखला मिळेल.

२) एकदा दाखला दिल्यानंतर पुन्हा त्याची दुसरी प्रत मिळविण्यासाठी तसेच पूर्वीच्या दाखल्यासंबंधी न्यायालयीन प्रतिज्ञापत्र व एफ.आय.आर. (पोलीस दप्तरी नोंद) द्यावे लागेल.

## अे.टी.के.टी.चे नियम

बी.एस.डब्ल्यू. अभ्यासक्रमासाठी अे.टी.के.टी. नियम खालीलप्रमाणे आहेत.

१) बी.एस.डब्ल्यू. साठी विद्यार्थ्याने एकूण थेअरी पेपर पैकी ३ थेअरी पेपर व क्षेत्रकार्यात पास झाल्यास त्यास पुढील सत्राला प्रवेश देता येईल.

२) क्षेत्रकार्यात (फिल्डवर्क) मध्ये नापास झालेल्या विद्यार्थ्यांना अंतिम परीक्षेत बसू दिले जाणार नाही. क्षेत्रकार्यात नापास झालेल्या विद्यार्थ्यांस परीक्षेपूर्वी सूचित करण्यात येईल अशा परिस्थितीत महाविद्यालयामार्फत अशा विद्यार्थ्यांचे क्षेत्रकार्य घेण्यात येईल.

## उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक गुणांची टक्केवारी :

| | | |
|---|---|---|
| अ) | थेअरी पेपर | – ३५ टक्के |
| ब) | क्षेत्रकार्य | – ५० टक्के |
| क) | शोधप्रबंध | – ५० टक्के |



समाजकार्य महाविद्यालय, चोपडा

श्रेणी विवरण

| | |
|---|---|
| ४० ते ४९ टक्के गुण | – पास श्रेणी |
| ५० ते ५९ टक्के गुण | – द्वितीय श्रेणी |
| ६० ते ६९ टक्के गुण | – प्रथम श्रेणी |
| ७० टक्के चे वर | – प्राविण्यासह प्रथम श्रेणीत |

## प्रवेश अर्ज भरतांना व सादर करण्यापूर्वी घ्यावयाची दक्षता

१) अर्जावरील फोटोवर प्राचार्यांची सही व शिक्का असणे आवश्यक आहे.

२) वडील हयात असतांना इतर कोणत्याही नातेवाईकांची पालक म्हणून अर्जावर सही चालणार नाही.

३) वडील, पालक, पती खाजगी अथवा सरकारी नोकरीत असेल तर त्याच्या एकूण वार्षिक उत्पन्नाचा दाखला, वेतन महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व इतर भत्ते संबंधित दाखला अधिकृत व्यक्तीच्या सही शिक्यानिशी अर्जास जोडावे.

४) शेती असल्यास शेतीच्या उत्पन्नाबाबत तहसिलदाराच्या दाखल्याची किंवा सरपंचाच्या दाखल्याची मूळ प्रत अर्जासोबत जोडावी.

५) शैक्षणिक काळात खंड पडला असल्यास प्रतिज्ञापत्र २०/– रूपये स्टॅम्पवर आणावे व खंड काळात शिष्यवृत्ती मिळाली नसल्यासंबंधी स्पष्ट उल्लेख करावा.

६) नूतनीकरण अर्जात शिष्यवृत्ती मंजुरी आदेश क्रमांक, कालावधी, निर्वाह भत्ता, ज्या दराने मंजूर झाला तो दरही नमूद करणे आवश्यक आहे.

७) विद्यार्थ्याने शिक्षणासाठी जिल्हा बदलविल्यास तसेच त्या जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांचे जिल्हा बदलविण्याचे परवानगीपत्र व मागील वर्षी भारत सरकार शिष्यवृत्ती मंजूर झाल्याबाबतचे संबंधित संस्था प्रमुखांचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

८) अर्जासोबत जोडण्यात येणाऱ्या झेरॉक्स कॉपी या समक्ष अधिकारी यांनी सांक्षांकित केलेल्या असावयास पाहिजे. अथवा प्राचार्य किंवा मुख्याध्यापकांकडून साक्षांकित असाव्यात.

टिप : वरील माहिती विद्यार्थ्याने काळजीपूर्वक वाचावी. माहिती अभावी अर्ज नामंजूर झाल्याबद्दलची जबाबदारी विद्यार्थ्यावर राहील.

## सर्वसाधारण नियम

१) महाविद्यालयातील विद्यार्थी हा २४ तास विद्यार्थी समजला जाईल. महाविद्यालयात व अन्यत्र त्याची वर्तणूक योग्य असली पाहिजे त्याची वागणूक, वर्तणूक अयोग्य राहिल्यास त्याला महाविद्यालयाकडून काढून टाकण्यात येईल.

२) वर्ग सुरु असतांना वर्गासमोर थांबणे किंवा फिरणे योग्य नाही. परिसरात सदैव शांतता राखावी.

३) फर्निचर, इलेक्ट्रीक फिटींग किंवा इतर नुकसानीबद्दल सामूहिक दंड लावला जाईल. फळ्याचा गैरवापर विद्यार्थ्यांनी करू नये.

४) उशिरा येणाऱ्या विद्यार्थ्याला वर्गात प्रवेश मिळणार नाही. अनुपस्थिती लिहीली जाईल. प्राध्यापक वर्गात येण्यापूर्वी विद्यार्थी वर्गात आपल्या जागेवर असावा .

५) पूर्व परवानगी शिवाय प्राचार्य, प्राध्यापक आणि कार्यालयाच्या कक्षात व अन्यत्र जेथे काम नाही अशा ठिकाणी प्रवेश करू नये.

६) अभ्यासपूरक कार्यक्रम प्राध्यापकांच्या नियंत्रणाखाली व प्राचार्यांच्या संमतीनेच ठरवतील.

७) आपले ओळखपत्र सदैव विद्यार्थ्यांनी जवळ बाळगले पाहिजे. महाविद्यालयातील कर्मचारी वर्गापैकी कोणीही मागणी केल्यास ते दाखविले पाहिजे.

८) महाविद्यालयात फक्त विद्यापीठ नियमानुसार विद्यार्थी प्रतिनिधी निवड होईल. अन्य कोणत्याही निवडणुका होणार नाही. अभ्यासेतर कार्यक्रम घेण्याकरीता विद्यार्थी मंडळ व अभ्यासमंडळ राहील पण त्यासाठी निवडणुका होणार नाही. त्यासाठी पात्र विद्यार्थ्यांची प्राचार्य मार्फत निवड करण्यात येईल.

९) प्राचार्यांच्या मते ज्या विद्यार्थ्यांचे आचरण महाविद्यालयाच्या अनुशासनाला घातक ठरेल, त्याला काढून टाकण्याचा अधिकार प्राचार्यांना राहील.

१०) क्षेत्रकार्यासाठी विविध समाजकल्याणकारी संस्थांमध्ये कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचा आदर्श राहील असे वर्तन करावे. संबंधीत संस्थेची शिस्त, नियम यांना बाधा पोहोचणार नाही याची काळजी विद्यार्थ्यांनी घ्यावयास पाहिजे. तसे न केल्यास संबंधीत विद्यार्थ्यांवर योग्य ती करवाई करण्यात येईल.

११) प्राचार्य, प्राध्यापक यांनी वेळोवेळी बोलविलेल्या सभांना संबंधित विद्यार्थ्यांनी हजर राहणे अनिवार्य आहे.





**Bhagini Mandal Chopda's**

## COLLEGE OF SOCIAL WORK CHOPDA, DIST. JALGAON

**For B.S.W.**

**UNIVERSITY CERCULAR No. 143/2003 & 124/2008.**

| Sr. No. | Particular | Graduate Course | | |
|---|---|---|---|---|
| | | F.Y. | S.Y. | T.Y. |
| 1. | Admission Fee | 50 | 50 | 50 |
| 2. | Registration Fee | 75 | 0 | 0 |
| 3. | Tution Fee | 800 | 800 | 800 |
| 4. | University Eligibility Fee | 100 | 0 | 0 |
| 5. | Library Fee | 200 | 200 | 200 |
| 6. | Medical Fee | 25 | 0 | 0 |
| 7. | Gymkhana Fee | 200 | 200 | 200 |
| 8. | Tutorial & Internal Exam | 100 | 100 | 100 |
| 9. | Disaster Management | 10 | 10 | 10 |
| 10. | Magazine Fee | 40 | 40 | 40 |
| 11. | College Development Fee | 90 | 90 | 90 |
| 12. | Student Activities Fee | 60 | 60 | 60 |
| 13. | Poor Student Aid Fund | 75 | 75 | 75 |
| 14. | Aswameth Sport Fee | 30 | 30 | 30 |
| 15. | Computerization Fee | 20 | 20 | 20 |
| 16. | Student Group Insurance | 5 | 5 | 5 |
| 17. | Gathering Fee | 60 | 60 | 60 |
| 18. | Alumni Association Fee | 25 | 25 | 25 |
| 19. | Per. Dev. & Career Gui. Fee | 25 | 25 | 25 |
| 20. | Field Work Fee | 400 | 400 | 400 |
| 21. | Environment Fee | 100 | 0 | 0 |
| 22. | Term Fee | 0 | 0 | 0 |
| 23. | Indenty Card Fee | 10 | 10 | 10 |
| | **Grand Total** | **2500** | **2200** | **2200** |
| 1. | University Exam Fee | 505 | 560 | 980 |
| 2. | Study Tour | 500 | 500 | 0 |
| 3. | Village Camp | 500 | 0 | 0 |
| 4. | Project Reports Exp. | 0 | 0 | 1000 |
| | **Grand Total** | **4005** | **3260** | **4180** |

# विद्यार्थ्यांसाठी विविध योजना :

**कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना :**

कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका ही पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आहे, तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, होतकरू गरजू विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणासाठी ही योजना आहे. या योजनेचा उद्देश स्वावलंबनाने विद्यार्थ्यांना श्रमाची आवड निर्माण करणे, श्रमाची प्रतिष्ठा वाढविणे, स्वयंरोजगारासाठी विद्यार्थ्यांनी अध्ययनाच्या वेळेव्यतिरिक्त किमान तीन तास काम करणे अपेक्षित आहे. या योजनेद्वारे विद्यार्थ्यांना आर्थिक लाभ मिळतो.

**साहस कार्यशाळा :**

विद्यार्थ्यांना साहसीवृत्ती निर्माण होण्याकरिता या कार्यशाळेत प्रशिक्षण व मार्गदर्शन दिले जाते. संकटांना धैर्याने सामोरे जाणे, मार्ग काढणे, मदत करणे, गिर्यारोहण, रोप वे, पूल बांधणे, रस्ते दुरुस्ती, दिशा ओळखणे, आकाश निरीक्षण, आत्मसंरक्षण व प्रथमोपचार आणि निसर्ग सहल असे विविध उपक्रम राबविण्यात येत असतात. प्रत्येक महाविद्यालयातील १ विद्यार्थी व १ विद्यार्थिनी या कार्यशाळेत सहभागी होऊ शकतात.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर वसतिगृह विद्यार्थी सहाय्यता योजना:**

विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रशाळा अथवा विभागांमध्ये पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी नियमित प्रवेशित व विद्यापीठाच्या वसतिगृहात निवासित विद्यार्थ्यांपैकी जे आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या होतकरू विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर वसतिगृह विद्यार्थी सहाय्यता योजना कार्यान्वित करण्यात आली आहे.

**उमवि संचलित चाचणी स्पर्धा परीक्षा :**

विद्यार्थ्यांमधील स्पर्धा परीक्षा कौशल्य वृद्धिंगत करण्यासाठी व पूर्वतयारीसाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ स्तरावर चाचणी स्पर्धा परीक्षा एकाच दिवशी आयोजित करण्यात येते. प्रत्येक महाविद्यालय हे परीक्षा केंद्र आहे. ५० पेक्षा जास्त परीक्षार्थी असलेल्या महाविद्यालयांना पूर्वतयारीसाठी स्पर्धा परीक्षा सुरू करण्यासाठी अनुदान देण्यात येते. उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रक देण्यात येतील. स्थानिक महाविद्यालयातील विद्यार्थी कल्याण अधिकारी हे उपक्रमाचे प्रमुख असतील. तलाठी, पी.एस.आय., तहसिलदार या पदांसाठीच्या स्पर्धा परीक्षेची तयारी या उपक्रमाद्वारे होईल. सदर परीक्षेत महाविद्यालयातील कितीही विद्यार्थी सहभागी होऊ शकतात.

**उमवि विद्यार्थी दत्तक योजना :**

विद्यापीठ विभागातील विविध प्रशाळा व शैक्षणिक विभाग येथील शिक्षण घेणाऱ्या गरजू व होतकरू विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी कल्याण विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०११–२०१२ पासून उमवि विद्यार्थी दत्तक योजना सुरू करण्यात आली आहे. त्यासाठी १० विद्यार्थी व १० विद्यार्थिनी यांना या योजनेचा लाभ देण्यात येतो.

**विद्यार्थी संशोधन योजना :**

संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी, संशोधक विद्यार्थी आर्थिक अडचणींमुळे मागे राहू नये यासाठी संशोधक विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाकडे भरीव आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. विद्यापीठाचे विभाग व संलग्नित महाविद्यालयांचे यांच्यासाठी संशोधन विकास योजना आहे. विद्यार्थी कल्याण विभाग अंतर्गत विद्यार्थी संशोधक प्रोत्साहन योजना, मा.कुलगुरू प्रायोजित विशेष संशोधन योजना विज्ञान : तंत्रज्ञान विषयात विशेष कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांस जी.एच. रायसोनी यांचे सौजन्याने तीन संशोधक विद्यार्थ्यांना रू. ७,०००/– ते रू. १०,०००/– पर्यंत प्रतिमाह संशोधन शिष्यवृत्ती दिली जाते.

**सांस्कृतिक गुण कार्यशाळा आयोजन :**

विद्यार्थ्यांना गायन, वादन, नृत्य, सूत्रसंचालन कार्यशाळा या क्षेत्रातील व नव्या संकल्पना तंत्रज्ञान अवगत व्हावे त्यांच्या सांस्कृतिक क्षेत्रातील प्रगती व्हावी यासाठी कार्यशाळांचे आयोजन विद्यापीठ स्तरावर विद्यार्थी कल्याण विभाग करते.

**युवती सभा कार्यशाळा :**

विद्यार्थी कल्याण विभागामार्फत नियमित शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता महाविद्यालयीन स्तरावर विशेष स्वरूपाच्या उपक्रमाचे आयोजन करणेकरिता युवती सभा अंतर्गत स्वयंसिध्दा – अभियान व विद्यार्थिनी व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा आयोजित करण्यात येते. प्रत्येक कार्यशाळेत महाविद्यालयातील ५० विद्यार्थिनी सहभागी होऊ शकतात.

**एकलव्य विद्याधन कर्ज योजना :**

एकलव्य विद्याधन कर्ज योजना ही पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आहे. योजनेत विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी येणाऱ्या खर्चाच्या ७० टक्के रक्कम कर्ज स्वरूपात आवश्यक त्या कागदपत्रांच्या पूर्ततेनंतर बँकेद्वारे उपलब्ध होते. शिक्षण कर्जासाठी व्याजाचा दर द.सा.द.शे. ११ टक्के असेल. शिक्षण कालावधीमधील खर्चाच्या व्याजाची रक्कम विद्यापीठ कार्यालयाद्वारे अदा केली जाते. ज्या विद्यार्थ्यांना प्रवेशित काळात शासकीय / निमशासकीय / सहकारी संस्था / बँका यांच्या कडून कोणतेही विद्यावेतन / शिष्यवृत्ती मिळत नसेल असाच विद्यार्थी या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र राहील.

**मा.कुलगुरू वैद्यकीय निधी योजना :**

विद्यार्थी सामुहिक सुरक्षा योजने शिवाय अपघाती / नैसर्गिक मृत्यू झाल्यास रक्कम ५,०००/– मृत विद्यार्थ्यांच्या पालकास मा.कुलगुरू वैद्यकीय निधीतून देण्यात येतील. प्रवेशीत विद्यार्थ्यास एखादा गंभीर आजार, अपघाताने जखमी झाल्याने उपचारासाठी योग्य त्या कागदपत्रांची खातरजमा करून सहाय्य करण्यात येते.